दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ बीड महाराष्ट्र | गुरूवार , 22 ऑक्टोबर 2026 | अंक क्र . 158 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल



# भक्ती-शक्तीचा एकजीव कुंभ : भगवान भक्तीगडावर जनसागराच्या 'विराट रूपाचे दर्शन !'

■ **बीड प्रतिनिधी**

दुष्काळाच्या काळात पाणी, चारा आणि जनावरांच्या जगण्याचा प्रश्न हा सर्वांसाठी समान असतो. त्यामुळे अशा संकटाच्या वेळी समाजात जातीधर्माच्या भिंती उभ्या करण्याऐवजी त्या मोडून काढण्याची गरज आहे.त्यामुळे जातिधर्माच्या भिंती तोडून दुष्काळाचा सामना करण्यासाठी एकजुटीने सज्ज व्हा अशी भावनिक हाक राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी भगवान भक्तीगडावरुन दिली. संत भगवानबाबा, लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या परंपरेच्या दसरा मेळाव्यात अठरापगड जातीतील भक्ती-शक्तीचा एकजीव `कुंभमेळा` आणि जनसागराच्या `विराट रूपाचे दर्शन यावेळी पहायला मिळाले.

भगवान भक्तीगडावरील आज झालेल्या दसरा मेळाव्यात पंकजाताई मुंडे यांचे उर्जादायी मार्गदर्शन झाले. बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नांवर त्यांनी भाष्य केले. त्याचबरोबर सामाजिक सलोखा, जाती भेदरहित एकजूट, आणि जेन -जी च्या प्रमुख मुद्द्यांवर पंकजाताईंनी आपल्या खास शैलीत मांडणी केली. व्यासपीठावर माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे आर्यमान पालवे, ॲड. यशश्रीताई मुंडे, ना. मेघनाताई बोर्डीकर ,माजी मंत्री धनंजय मुंडे, माजी मंत्री महादेव जानकर, आ.मोनिका राजळे, अक्षय मुंदडा, आ.रत्नाकर गुट्टे, माजी खासदार सुजय विखे, माजी मंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार , माजी आ.केशवराव आंधळे, माजी आमदार भीमराव धोंडे, प्रा. लक्ष्मण हाके,ॲड. मंगेश ससाने, ह भ प राधाताई सानप, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह आजी-माजी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते ,पदाधिकारी उपस्थित होते. सभेचे प्रस्ताविक डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी केले तर यावेळी महादेव जानकर ,डॉ. सुजय विखे, धनंजय मुंडे यांची समयोचित भाषणे झाली.

आपल्या तडाखेबंद भाषणात पंकजाताई म्हणाल्या, या वाघांना ऊन लागत नाही, माझ्या कातड्याचे जोडे करून तुम्हाला घातले तरी तुमचे उपकार फिटू शकत नाहीत. हा दुष्काळातला मेळावा आहे, लग चुकी है तलक जितकी खुदको आदमी छोड देंगे.. मी कधीही कुठला निर्णय घेताना पुढचा विचार केला नाही, मी क्षणात भगवान गडावर भगवान भक्तीगड स्थापन केला की नाही? ही आजची शक्ती आहे, लेकीची शक्ती आहे, गोपीनाथ मुंडेंच्या लेकीची शक्ती आहे. श्वानाला दगड मारल्यास तो ओरडतो, पण आपण मधमाशांच्या पोळ्याला दगड मारलं की ते अंगावर येतो, असे म्हणत पंकजाताई मुंडेंनी आपली ताकद दाखवण्याचं आवाहन केलं.

### जातीपातीच्या भिंती मोडून काढा

आपल्याला अशी तरुण पिढी नको जी देशभक्त नाही, देशाबद्दल आदर नाही. जयप्रकाश नारायण यांसारख्यासोबत काम केले, गोपीनाथ मुंडे सारखे सैनिक तयार केले. तुम्ही खरे झेन झी आहात, आमचा आर्यमान पण जेन झी आहे. पुरुष नेतृत्व जेन-झींना करायचं आहे. आपल्याला माणसा माणसात भिंत उभी करायची नाही. आपल्याला धर्माच्या नाही तर जातीच्या भिंती मोडून काढायच्या आहेत, असे म्हणत पंकजाताई मुंडेंनी जातीभेदाला थारा न देण्याचं आवाहन केलं.



## दुष्काळ गरीब श्रीमंती पाहत नाही

■ दुष्काळामध्ये जाती-धर्माच्या भीती तोडून काढायच्या आहेत. मी जालन्यातील अंतरवली गाव दत्तक घेतलं आहे, मी आंतरवलीचा विकास करणार आहे. बीडमधल्या गावाचा विकास कसा केला तसा अंतरवलीचा विकास करणार आहे, असेही पंकजाताई मुंडेंनी म्हटले. जातीपातीच्या नावावर राजकारण करणाऱ्यांना भविष्य नाही, शिक्षण नसलेला विचारी नाही तर विषारी असल्याचे पंकजाताई यांनी म्हटले.

## दुष्काळात मी तुमची सावली होईल

■ **भीड मे खडा होना मक्सद नही है मेरा, भीड जिसके लिए खडे होती है वह बनना है मुझे... अशी शायरी म्हणत नेतृत्वाचा संदेश पंकजाताई यांनी दिलाय. माझ्या मनात स्वार्थ असला असता तर तुम्ही इथं आला असतात का? माझी हात जोडून तुम्हाला विनंती आहे, हा देश व्यसनाच्या आधीन झाला आहे. व्यसन सोडण्याचा आवाज केला तरी व्यसन सोडलं पाहिजे, मी तुम्हाला आवाहन केलं लेकीला जन्म घेऊ द्या, मी मागचा दुष्काळ हाताळला होता, हाही दुष्काळ हाताळू. सीएसआर फंडातून मी चारा पोहोचवण्यासाठी, अनुदानासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत काम करुन सावली बनण्याचं काम करेल, असेही त्यांनी म्हटले.दुष्काळात आपल्याला एक मोठे काम करायचं आहे. ये पेड के पत्ते शाखे भी परेशान हो जाते, अगर परिंदे भी हिंदू मुसलमान हो जाते.. अशी शायरी म्हणत पंकजाताई यानी जाती-धर्मावर प्रहार केला. मी टोपलं आणि खोरं घेऊन तुमच्या नदीचं संवर्धन करण्यासाठी आल्याशिवाय राहणार नाही, असेही त्यांनी यावेळी म्हटले. आता राजकारणात सकारात्मकता पाहिजे आहे. नगद नारायण आणि गहिनीनाथ, मच्छिंद्रनाथ गडाला मी नमन करते, आमचा दसरा मेळावा का कुणाच्या डोळ्यात खुपावा. सगळ्या समाजाचं भलं करण्यासाठी हृदयात प्रेम, भविष्याची जाणीव लागते, तोंडातून चांगलं बोलावं लागतं, संस्कार लागतात, असेही पंकजाताई यांनी यावेळी म्हटले.**

## क्षणचित्रं

- **दसरा मेळाव्यासाठी ना. पंकजाताई मुंडे, डॉ. प्रितमताई मुंडे, ॲड यशःश्रीताई मुंडे आर्यमन पालवे यांचे खास हेलिकॉप्टरने आगमन**
- **राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, धनंजय मुंडे, मोनिका राजळे यांचे देखील दुसऱ्या हेलिकॉप्टरने आगमन झाले.**
- **हेलिपॅड ते व्यासपीठापर्यंत आ. पंकजाताई व प्रितमताई यांचे कार्यकर्त्यांकडून वाजतगाजत जेसीबीतून पुष्पवृष्टी करत जोरदार स्वागत**
- **व्यासपीठावर येण्यापूर्वी स्मारकातील राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या मूर्तीचे दर्शन व पूजा करून ना. पंकजाताईंकडून आरती**
- **व्यासपीठावर येताच ना. पंकजाताईंनी उपस्थित जनसागराला वंदन केले तसेच साडीच्या पदराने त्यांची नजर काढली.**
- **संत भगवान बाबा स्मारक ट्रस्ट, सावरगाव घाट ग्रामपंचायत तसेच ऊसतोड मजूर संघटनेच्या वतीने त्यांचे ऊसाची मोळी व दुर्गामातेची मूर्ती देऊन स्वागत**
- **मराठा, धनगर, बंजारा, माळी, गुजर आदी समाज बांधवांच्या वतीने ना. पंकजाताई यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. प्रितमताई मुंडे, सुजय विखे, महादेव जानकर, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांची यावेळी समयोचित भाषणे झाली.**
- **मेळाव्याला राज्याच्या कानाकोपऱ्यातून अठरा पगड जातीचे लोकं मिळेल त्या वाहनाने आणि घरची चटणी भाकरी घेऊन अतिशय उत्साहाने प्रचंड मोठया संख्येने सहभागी झाले. मेळावा शांततेत, शिस्तीत पार पडला. पोलिसांनी तगडा बंदोबस्त तैनात ठेवला होता.**

- **ना. पंकजाताई मुंडे यांच्या तडाखेबंद अन् दमदार भाषणाने उपस्थितांमध्ये नवचैतन्य**
- **जातीधर्माच्या भिंती तोडून दुष्काळाचा सामना करण्यासाठी एकजुटीने सज्ज व्हा**
- **दसरा मेळाव्यात पंकजाताईंनी दिला जाती भेदरहित सामाजिक सलोखा- प्रेमाचा संदेश**



## संपादकीय

# राष्ट्रनिर्माणाची तपपूर्ती....

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील केंद्र सरकारला २६ मे २०२६ रोजी १२ वर्षे पूर्ण झाली. भारताच्या राजकीय इतिहासात एखाद्या राष्ट्रनेत्याने सलग एक तपाचा कालखंड पूर्ण करत अत्यंत कणखरपणे आणि विजिगीषू वृत्तीने देशाच्या विकासाचा गाडा हाकण्याची ही आधुनिक काळातील एक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक घटना आहे. या गौरवशाली 'तपपूर्ती'चे औचित्य साधून महाराष्ट्र भाजपने प्रकाशित केलेला 'राष्ट्रनिर्माणाची तपपूर्ती' हा विशेष ग्रंथवजा अंक म्हणजे २०१४ ते २०२६ या कालखंडातील भारताच्या धोरणात्मक घडणीचा, व्यवस्थापकीय बदलांचा आणि सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराचा वेध घेणारा एक अभ्यासपूर्ण आलेख आहे. हा ग्रंथ गेल्या १२ वर्षांतील कळीचे निर्णय आणि प्रगतीच्या विविध टप्प्यांवर अतिशय सूक्ष्मपणे प्रकाश टाकतो. अयोध्येतील भव्य राममंदिराची उभारणी, जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० चे उच्चाटन, तीन तलाक पद्धती रद्द करण्याचा निर्णय आणि आंतरराष्ट्रीय पटलावर भारताने निर्माण केलेले नवे स्थान यांसारखे कित्येक दशके प्रलंबित असलेले मुद्दे प्रत्यक्षात कसे उतरले, याचा पूर्व इतिहास आणि सद्यस्थितीचा वस्तुनिष्ठ मागोवा या अंकात प्रामुख्याने घेण्यात आला आहे.

या विशेष अंकाची रचना आणि त्यातील प्रकरणांची मांडणी अत्यंत विचारपूर्वक करण्यात आली असून, या सर्व विकासकामांचा वैचारिक पाया स्पष्ट करण्यासाठी संपादकांनी 'भा-ज-पा' या तीन आद्याक्षरांचा अत्यंत नाविन्यपूर्ण, व्यापक आणि सांस्कृतिक अर्थ लावला आहे. संपूर्ण ग्रंथाची वैचारिक वीण याच त्रिसूत्रीभोवती विणलेली दिसते. पुस्तकातील पहिल्या सूत्रानुसार, 'भा' म्हणजे 'भारतीयत्व', जे केवळ नागरिकत्वाचा तांत्रिक पुरावा नसून आपली मूळ सांस्कृतिक ओळख आहे. पंतप्रधानांनी 'विकास भी, विरासत भी' हा मंत्र देऊन भारताच्या प्राचीन वैभवाला आधुनिकतेशी जोडल्याचे हा ग्रंथ अधोरेखित करतो. योग आणि आयुर्वेदाला जागतिक पातळीवर मिळालेला सन्मान या सूत्रात ठळकपणे मांडला आहे. दुसरे सूत्र म्हणजे 'ज' म्हणजेच 'जनकल्याण', ज्यामध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या अंत्योदयाचा विचार केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे. सत्तेचा केंद्रबिंदू हा केवळ विशिष्ट वर्ग न राहता समाजाच्या शेवटच्या रांगेतील शेवटचा माणूस कसा बनला, याचे सविस्तर विवेचन यात आहे. जनकल्याण म्हणजे सवलतींची खैरात करणे नसून, नागरिकांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करणे हा या काळातील खरा बदल असल्याचे ग्रंथ सांगतो. तिसरे सूत्र म्हणजे 'पा' अर्थात 'पारदर्शकता', जी भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाचा पाया मानली गेली आहे. "ना खाऊंगा, ना खाने दूंगा" हा नारा म्हणजे प्रशासनातील शुद्धीकरणाचा पाया होता, असे सांगत तंत्रज्ञानाच्या आणि 'डिजिटल इंडिया'च्या साथीने दलालांची साखळी कशी तोडली गेली आणि सरकारचा प्रत्येक रुपया थेट लाभार्थ्यांच्या खात्यात कसा जमा झाला, याचे प्रभावी विश्लेषण अंकात वाचायला मिळते.

अंकाची एकूण १३ प्रकरणांमध्ये केलेली विभागणी देशाच्या विविध क्षेत्रांतील प्रगतीचा सर्वसमावेशक आढावा घेणारी आहे. अंकाची सुरुवात 'एक भारत अखंड भारत' आणि 'सुरक्षित भारत, संरक्षित भारत' या दोन प्रकरणांनी होते. भारतासारख्या प्रचंड भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधता असलेल्या खंडप्राय देशात प्रशासकीय सुसूत्रता आणि एकात्मता आणणे हे स्वातंत्र्यानंतरचे सर्वात मोठे आव्हान होते, असे पुस्तक सांगते. स्वातंत्र्यापासून अनेक दशके काश्मीरसारखे राज्य भारतापासून अंतर राखून होते, परंतु कलम ३७० रद्द करून भारताचा भूगोल आणि राजकीय सीमा खऱ्या अर्थाने एकसंध झाल्याचे अंकात नमूद केले आहे. सुरक्षेच्या आघाडीवर, भारताचे धोरण मवाळ भूमिकेकडून 'कठोर राष्ट्रवादा'कडे कसे वळले, याचा इतिहास यात सविस्तर दिला आहे. माजी संरक्षण मंत्री स्व. मनोहर पर्रीकर यांचे तांत्रिक कौशल्य आणि पंतप्रधान मोदींचा राजकीय दृढनिश्चय ही जोडगोळी सुरक्षा क्षेत्रासाठी कशी गेमचेंजर ठरली, यावर पुस्तकात भर देण्यात आला आहे. २०१६ चा सर्जिकल स्ट्राईक आणि २०१९ चा बालाकोट एअरस्ट्राईक या निर्णयांमुळे शत्रूच्या घरात शिरून चोख उत्तर देणारा सामर्थ्यशाली भारत आकारास आल्याचे पुस्तकात म्हटले आहे. नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी आखलेली रणनीती आणि सीमांवरील जवानांना दिलेली अत्याधुनिक शस्त्रे यांमुळे देशाची अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा कशी अभेद्य बनली, याचे चित्र यात रेखाटले आहे.

पुढील प्रकरणांमध्ये 'भारत अंत्योदय - वंचितांचा उदय' हा भाग जनसंघाचे प्रणेते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानववादाच्या विचाराला समर्पित करण्यात आला आहे. "जोपर्यंत समाजाच्या शेवटच्या रांगेतील माणसाचा उत्कर्ष होत नाही, तोपर्यंत राष्ट्र प्रगत होऊ शकत नाही," हा वैचारिक वारसा सरकारने प्रत्यक्ष योजनांमध्ये आणल्याचे आकडेवारीसह दाखवले आहे. ८० कोटी नागरिकांसाठीचा गरिब कल्याण अन्न वितरण कार्यक्रम, २५ कोटी नागरिकांना दारिद्र्यरेषेबाहेर काढण्याची ऐतिहासिक कामगिरी, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना आणि बेघरांना पक्की घरे देणारी आवास योजना यांमुळे सामान्य माणसाचे जीवनमान कमालीचे उंचावल्याचा उल्लेख पुस्तकात आहे. तसेच, 'नारीशक्ती - मातृप्रधान भारत' या प्रकरणात महिलांच्या सक्षमीकरणाचा टप्पा मांडताना 'चांद्रयान-३' च्या यशात महिला शास्त्रज्ञांचा असलेला सिंहाचा वाटा प्रामुख्याने अधोरेखित केला आहे. ग्रामीण भागातील 'ड्रोन दीदी' ते लढाऊ विमाने चालवणाऱ्या रणरागिणींपर्यंतची झेप यात टिपली आहे. 'तिहेरी तलाक' विरोधी कायदा करून मुस्लीम महिलांना दिलेले सामाजिक संरक्षण आणि संसदेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा ऐतिहासिक 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा महिलांच्या राजकीय आणि सामाजिक अधिकारांचा सुवर्णकाळ ठरल्याचे नमूद करण्यात आले आहे. 'उद्योग भारत' आणि 'युवाकेंद्रित भारत' या प्रकरणांमधून देशातील आर्थिक व शैक्षणिक क्रांतीचा वेध घेण्यात आला आहे. "कायद्यांचे जंगल" आणि "परवानग्यांचे चक्रव्यूह" मोडीत काढून व्यवसाय सुलभता कशी आणली, हे सांगताना 'स्टार्टअप इंडिया'मुळे आजचा तरुण नोकरी मागणारा न राहता नोकरी देणारा कसा बनला आहे, हे पुस्तकात विशद केले आहे. 'जेम पोर्टल' आणि 'ओएनडीसी' मुळे गल्लीतील छोट्या व्यापाऱ्याला जागतिक कंपन्यांच्या तोडीस तोड बाजारपेठ मिळाल्याचे म्हटले आहे. तरुणांच्या हाताला कौशल्य देण्यासाठी राबवलेली 'स्किल इंडिया' मोहीम, क्रीडा क्षेत्रात दुर्गम भागातील खेळाडूंना ऑलिम्पिकपर्यंत पोहोचवणारी 'खेलो इंडिया' योजना आणि रोजगाराभिमुख आणि मातृभाषेला प्राधान्य देणारे 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' यांमुळे भारतीय युवा जागतिक पटलावर विकसित भारताचा शिल्पकार म्हणून कसा उभा राहिला आहे, याची प्रचिती हे प्रकरण वाचताना येते. यासोबतच, तंत्रज्ञान आणि विज्ञानाचा मिलाफ सामान्यांच्या आयुष्यात कसा बदल घडवून आणतो, याचे उत्तम विश्लेषण 'विज्ञान भारत' आणि 'अभिनव भारत' या प्रकरणांमध्ये पाहायला मिळते. कोरोना महामारीच्या अत्यंत कठीण काळात भारताने स्वतःची 'मेड इन इंडिया' लस शोधून काढलीच, पण 'व्हॅक्सिन मैत्री'च्या माध्यमातून जगालाही संकटातून वाचवले, हा भारताच्या विज्ञानाने जागतिक पटलावर तयार केलेला दबदबा होता, असे पुस्तकात नमूद आहे. 'डिजिटल इंडिया'च्या माध्यमातून निर्माण झालेली पारदर्शक व्यवस्था आणि कागदमुक्त प्रशासनाचा प्रवास यात मांडला आहे. सामान्य माणसाला ओळखपत्रासाठी आता सरकारी बाबूंच्या कचाट्यात अडकावे लागत नाही, तर भू-आधार, अपार आयडी, ई-श्रम कार्ड आणि वृद्धांना सन्मानाचे आरोग्य कवच देणारे 'आयुष्मान वय वंदन कार्ड' या डिजिटल आविष्कारांनी सर्वसामान्यांचे हक्क त्यांच्या हातातील मोबाईलपर्यंत पोहोचवले आहेत. 'भाषिणी' सारख्या प्रणालींमुळे भाषेची भिंत तोडून संवाद साधणे आता शक्य झाल्याचे ग्रंथ सांगतो.

# 'कविता रंगते काजागिरीत' या काव्यमैफलीचे रविवारी आयोजन

## म.सा.प.परळी व समाजभूषण स्व. सुवालालजी वाकेकर प्रतिष्ठानचा उपक्रम







**परळी,( प्रतिनिधी )**

येथील मराठवाडा साहित्य परिषद आणि समाजभूषण स्व. सुवालालजी वाकेकर सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'कविता रंगते काजागिरीत' या अंतर्गत निमंत्रित कवींच्या कवितांची बहारदार 'काव्यमैफल' दि. २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६:३० वा.कल्याणकारी हनुमान मंदिर प्रांगण माणिक नगर,येथे आयोजित करण्यात आली आहे.या काव्यमैफलीत निमंत्रित कवी आपल्या विविधरंगी कवितांचे सादरीकरण करणार आहेत.त्यात मधुर गळ्यातून कवितेची अभिव्यक्ती करणारे व सूत्रसंचालनाने रसिक श्रोत्यांचे मनं जिंकणारे ,महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध वक्ते म्हणून परिचित असलेले छत्रपती संभाजीनगरचे अविनाश भारती ;आशय व अभिव्यक्ती याची एकरूपता ज्यांच्या कवितेत अनुभवायला मिळते अशा अहमदपूरच्या रंजना गायकवाड, गेय अभिव्यक्तीतून ज्यांची कविता ऐकतच राहावीशी वाटते असे गंगाखेडचे कवी आत्माराम जाधव ;कसदार लेखनामुळे गझलेच्या प्रांतातलं एक लोकप्रिय नाव असलेले पालमचे आत्तम गेंदे ; मानवतेची गाणी गोड गळ्यातून सादर करणारे व सामाजिक जाणिवा, संवेदनांचा जागर घालणारे परळी वैजनाथचे अरुण पवार ;विनोदी शैलीत व तरन्नुममधून बहारदार गझलांचे सादरीकरण करणारे दिवाकर जोशी ; बदलते ग्रामीण जीवन व भ्रष्टव्यवस्थेवर प्रखर हल्ला करणारे ,सुप्रसिद्ध शाहीर म्हणून ख्याती असलेले अनंत मुंडे आणि विविध कलेत पारंगत असलेले व कवितेच्या क्षेत्रातही एका विशिष्ट उंचीवर पोहोचलेले सिद्धेश्वर इंगोले हे निमंत्रित कवी आपल्या कवितांचे सादरीकरण करणार आहेत.

या कार्यक्रमाचे उद्घाटन परळी वैजनाथच्या नगराध्यक्षा मा.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते होणार असून मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष मा. विजयसेठ वाकेकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मा.बाजीराव भैय्या धर्माधिकारी,मा.सुरेशअण्णा टाक, प्रा.पवन मुंडे,मा.रमेश पवार,प्रा.माधव रोडे,मा.हाजी बाबू,प्रितेश तोतला आणि अमित केंद्रे यांची उपस्थिती लाभणार आहे. कवितेच्या माध्यमातून विविध भावभावनांचा आविष्कार घडविणाऱ्या या काव्यमैफलीत साहित्यप्रेमींना शब्दांचा आनंद,भावनांचा स्पर्श आणि काव्यरसाची अनोखी अनुभूती मिळणार आहे.या कार्यक्रमाला परळी पंचक्रोशीतील साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने म.सा.प.चे अध्यक्ष विजयसेठ वाकेकर ,सचिव प्रा.डॉ. राजकुमार यल्लावाड ,कोषाध्यक्ष प्रा. संजय आघाव ,प्रसिद्धी प्रमुख बालाजी कांबळे ,सहसचिव प्रा.डॉ.अर्चना चव्हाण,सल्लागार बंडू आघाव ,सदस्य महेश होनमाने ,सुनिता कोमावार,विजया दहिवाळ ,चेतना गौरशेट्टे, डॉ.राजाभाऊ धायगुडे, प्रा.डॉ. रामेश्वर चाटे,सुनिलनाना फुलारी,महेशआप्पा शिंदे, रमेशआप्पा काळे, डी.एस. राठोड, शंकरराव गवते, विष्णू दहिफळे , सुनील देशमुख नरेंद्र राठोड आदींनी केले आहे.

# लोकमानस

## मुलखावेगळी माणस

पर्यावरण बचावचा सायकल प्रवासाद्वारे संदेश.

'आवरा प्रदूषणाला,जपा पर्यावरणाला,सावर स्वतःला'असा समाजाला संदेश देत प्रणाली चिकटे या २१ वर्षाच्या तरुणीने पर्यावरणपूरक शून्य बजेट सायकल चालवत आपला प्रवास सुरु केला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पुनवट येथून एकटीने हा सायकल प्रवास प्रणालीने सुरु केला आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर सायकलने प्रवास करून पर्यावरण बचावाचा संदेश देणारी प्रणाली म्हणूनच तमाम तरुणाईसाठी प्रेरणा ठरलेली आहे. या प्रवासात लोकांना पर्यावरण रक्षणाचा संदेश देत पुनवट ते चंद्रपूर आणि चंद्रपूर ते सेवाग्राम वर्धा पुढे देवळी बोपापूर दिघी असा सुमारे ३५० किलोमीटरचा सायकल प्रवास प्रणालीने आतापर्यंत पूर्ण केला आहे.

पुढील काळात विदर्भ,मराठवाडा,पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्र असा प्रणालीचा सायकलने प्रवास सुरु असणार आहे. प्रणाली आपल्या सायकल प्रवासाच्या द्वारे ग्रामीण साक्षरता विकास संस्थेच्या वतीने आयोजित वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार देखील करते आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणजे पुस्तक आपल्या दारी,चालते फिरते वाचनालय या मोहिमेअंतर्गत प्रणाली गावागावात सायकलवर फिरून विशेषतः तरुणांना वाचनाचा संदेश देते आहे. या मोहिमेत फेसबुक या लोकप्रिय सोशल मीडिया मंचावर वाचन संस्कृती चळवळ वर्धा असे पेज तयार करण्यात आले आहे. प्रणाली हिने विविध थोर महापुरुषांच्या जयंती निमित्त पर्यावरण बचाव आणि वाचाल तर वाचाल या विषयावर अनेकदा उस्फुर्त भाषणातून लोंकांशी मुक्त संवाद देखील साधलेला आहे. लोकसंवादानंतर तिचे माध्यम साक्षरता संस्थेच्या वतीने पुरुष मंडळीने संविधान पुस्तक आणि शाल व श्रीफळ देऊन सन्मान देखील केला आहे. थोर महापुरुषांच्या लोकप्रबोधनाचा वारसा जपत प्रणाली प्रतायक्ष सायकल प्रवास करून महारष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पोहचत पर्यावरण बचावचा संदेश लोकांना देते आहे.आपल्या या सायकल प्रवासातून ती इंधनाचे महत्व तर लोकंना पटवून देत आहेच, शिवाय अशा प्रकारे जर जवळच्या प्रवासाकरिता प्रत्येकाने सायकचा प्रवास जर केला तर त्यामुळे प्रदूषण देखील कमी होईल आणि साहजिकच पर्यावरणाचे देखील रक्षण होईल. प्रणाली जेंव्हा सायकलद्वारे हा प्रवास करते तेंव्हा गावागावात आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये तरुणाईकडून तिला उस्फुर्त प्रतिसाद मिळतो आहे. तिच्या या धाडसी प्रवासाची नोंद अनेक वर्तमानपत्र आणि दृक्श्राव्य माध्यमांनी देखील घेतलेली आहे आणि तिचे कौतुक केलेलं आहे. प्रणालीला अनेक सामाजिक संस्थांनी आर्थिक मदतीचा हात देखील दिला जो आर्थिक निधी प्रणालीने पर्यावरण बचाव या कामासाठीच अर्पित केला आहे. एकूणच,अवघ्या २१ व्या वयात प्रणाली सारखी एक तरुणी आपल्या समोर एक सामाजिक उत्तरदायित्व म्हणून पर्यावरण रक्षणासाठी महाराष्ट्रभर सायकलने प्रवास करते हि खरोखरच दखलपात्र आणि अभिनंदनीय गोष्टच ठरते.

**दखल**

## महाराष्ट्राच्या फराळाचा सुगंध आता सातासमुद्रापार!

दिवाळी म्हणजे आनंद, प्रेम, आपुलकी आणि गोडव्याचा सण! घराघरांत तयार होणारा चकली, चिवडा, लाडू, करंजी, शंकरपाळे अशा पारंपरिक फराळाचा आस्वाद घेतल्याशिवाय दिवाळीचा आनंद पूर्ण होत नाही. पण नोकरी, शिक्षण किंवा व्यवसायानिमित्त परदेशात राहणाऱ्या आपल्या मुलांना, नातेवाइकांना आणि मित्रपरिवाराला घरचा फराळ कसा पाठवायचा, हा प्रश्न अनेकांना पडतो.आता काळजी कशाला? आपले हक्काचे पोस्ट ऑफिस आहे ना!

महाराष्ट्र टपाल परिमंडळाने नागरिकांना आपल्या परदेशातील आप्तेष्टांपर्यंत दिवाळीचा गोडवा पोहोचवता यावा, यासाठी पोस्ट ऑफिसच्या आंतरराष्ट्रीय पार्सल सेवेच्या माध्यमातून आकर्षक व माफक दरात पार्सल पाठविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.भारतीय टपाल विभागाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल, महाराष्ट्र टपाल परिमंडळ, श्री. रामचंद्र जायभाये यांनी या उपक्रमाला दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल महाराष्ट्रातील नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. तसेच सर्वांना आनंदी, मंगलमय व समृद्ध दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. परदेशात राहणाऱ्या आपल्या नातेवाइकांना व मित्रांना घरचा फराळ आणि दिवाळीच्या भेटवस्तू पाठविण्यासाठी पोस्ट ऑफिसच्या आंतरराष्ट्रीय पार्सल सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. फराळ आणि भेटवस्तू व्यवस्थित व सुरक्षितपणे पाठविता याव्यात, यासाठी महाराष्ट्रातील सर्व जनरल पोस्ट ऑफिस मुख्य पोस्ट ऑफिस आणि निर्धारित पोस्ट ऑफिसमध्ये दर्जेदार पॅकिंगची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**असा लागला शोध**

## टूथब्रश

टूथब्रशचा शोध चीनमध्ये १४९८ मध्ये लागला, तर आधुनिक व्यावसायिक टूथब्रशचा शोध १७८० मध्ये इंग्लंडमध्ये विल्यम ॲडिस (यांनी लावला. टूथब्रश येण्यापूर्वी भारतात कडुलिंब, मिस्वाक किंवा बाभूळच्या काड्यांचा (दातूचा) वापर केला जात असे. याशिवाय कोळसा, राख आणि मीठ वापरून बोटांनी दात घासले जात असत. चीनमध्ये मिंग राजवंशाच्या काळात पहिला टूथब्रश बनवला गेला. त्याला बांबू किंवा हाडाचे हँडल होते आणि त्यावर डुकराचे कडक केस बसवलेले होते. २६ जून १४९८ रोजी चीनच्या राजाने याची रचना केली होती, म्हणून २६ जून हा दिवस 'टूथब्रश डे' म्हणूनही ओळखला जातो. इंग्लंडमधील विल्यम ॲडिस नावाच्या व्यक्तीला एका गुन्ह्यासाठी तुरुंगात जावे लागले होते.तुरुंगात असताना दात साफ करण्यासाठी त्यांनी जेवणात मिळालेले प्राण्याचे हाड आणि रक्षकाकडून मिळवलेले प्राण्याचे केस एकत्र करून एक साधन तयार केले.तुरुंगातून सुटल्यानंतर १७८० मध्ये त्यांनी मोठ्या प्रमाणावर टूथब्रश बनवण्याचा कारखाना सुरू केला आणि त्यांची कंपनी व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी झाली. प्राण्यांच्या केसांचे ब्रिस्टल्स नसल्यामुळे आणि जीवाणू साचत असल्याने, १९३८ मध्ये 'ड्यूपॉण्ट' या अमेरिकन कंपनीने प्राण्यांच्या केसांऐवजी नायलॉनच्या मऊ तंतूंचा वापर करून टूथब्रश तयार केले. हे खूप लोकप्रिय झाले.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर संत-महंतांच्या उपस्थितीत १८ वा दसरा मेळावा उत्साहात संपन्न !



**देऊळगाव घाट | प्रतिनिधी**

विजयादशमीच्या पावन पर्वानिमित्त श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर आयोजित १८ व्या दसरा मेळाव्यात विविध संत-महंतांच्या उपस्थितीत दर्शन घेतले आणि उपस्थित नाथभक्तांशी संवाद साधला. श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा संगम असलेल्या या पवित्र स्थानी आल्यानंतर मनाला नवी ऊर्जा आणि स्फूर्ती मिळते.

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांशी संवाद साधताना त्यांच्या अडचणी, चिंता आणि आगामी काळातील आव्हानांबाबत चर्चा केली. दुष्काळाची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेता शेतकऱ्यांनी आर्थिक नियोजन करावे, अनावश्यक खर्च टाळावा आणि कोणत्याही परिस्थितीत हतबल होऊन चुकीचा निर्णय घेऊ नये, असे आवाहन केले. "अडचणीत असाल, तर एक फोन सुरेश धसला करा; तुमच्या मदतीसाठी मी २४ तास तत्पर आहे," या शब्दांत शेतकरी बांधवांना विश्वास दिला.

दुष्काळाच्या संकटात केवळ शेतकरी कुटुंबांचाच नव्हे, तर पशुधन आणि वन्यजीवांचाही विचार करणे गरजेचे आहे. या संकटावर मात करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असून, आपण सर्वांनी एकजुटीने या परिस्थितीचा सामना करायचा आहे.

श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड हे माझ्यासाठी श्रद्धेचे आणि स्फूर्तीचे स्थान आहे. या पवित्र व्यासपीठावर राजकीय भाष्य न करता धार्मिक परंपरा आणि अध्यात्माचा सन्मान जपण्याची भूमिका यावेळीही कायम ठेवली. तसेच पुढील वर्षापासून विजयादशमीच्या आदल्या दिवशी शस्त्रपूजन करून दसरा मेळावा आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला.

### ■ संत मांदियाळी उपस्थिती

या मेळाव्यास ह.भ.प. बाळू महाराज गिरगावकर, भागवताचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जवळेकर, काशिनाथ महाराज (गणेशगड), मा. आ. साहेबराव नाना दरेकर, ह.भ.प. रामाचार्य मंदार महाराज, ह.भ.प. रामकृष्ण महाराज, उ.भ.प. रोहिदास महाराज, ह.भ.प. गव्हाणे महाराज, केदार महाराज, ह.भ.प. कल्याण महाराज, ह.भ.प. मोहन महाराज शेलार, ह.भ.प. शिवाजी महाराज जगताप, ह.भ.प. अशोक महाराज भोसले, ह.भ.प. लक्ष्मण महाराज सस्ते, ह.भ.प. विनायक महाराज औटे-म्हस्के, ह.भ.प. कमण लक्ष्मण महाराज म्हस्के, ह.भ.प. भानुदास महाराज म्हस्के, ह.भ.प. दिनकर महाराज म्हस्के, ह.भ.प. मालुसरे महाराज, उंबरेकर महाराज आणि नाथगायक आकाश शिंदे यांच्यासह विविध संत-महंत, नाथभक्त आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अन्न सुरक्षा, महिला सक्षमीकरण आणि डिजिटल परिवर्तनावर भारताचा भर

## संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी मांडली भारताची भूमिका; शेतकरी, महिला आणि ग्रामीण विकासावर दिला जोर

**जव्हार (वा.)** | अन्न सुरक्षा, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि डिजिटल सार्वजनिक सेवांचा विस्तार ही शाश्वत विकासाची महत्त्वाची सूत्रे असल्याचे भारताने संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत अधोरेखित केले. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मुख्यालयात पार पडलेल्या महासभेच्या दुसऱ्या समितीच्या आणि आर्थिक व सामाजिक परिषदेच्या (ECOSOC) संयुक्त बैठकीत भारताच्या वतीने खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी भूमिका मांडली. कृषी क्षेत्रातील गुंतवणूक, महिलांचे आर्थिक स्वावलंबन आणि ग्रामीण भागातील डिजिटल सुविधांची उपलब्धता यांवर त्यांनी विशेष भर दिला.

### ■ शेतकरी आणि अन्न सुरक्षेला प्राधान्य

कृषी क्षेत्रातील गुंतवणुकीचा लाभ अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, नागरिकांना परवडणाऱ्या दरात सुरक्षित व पौष्टिक अन्न उपलब्ध करून देणे आणि हवामानातील बदलांसह बाजारपेठेतील आव्हानांचा सामना करण्यासाठी सक्षम कृषी व्यवस्था उभारणे गरजेचे असल्याचे भारताने स्पष्ट केले.

विकसनशील देशांतील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, हवामानविषयक माहिती आणि कृषी सल्लागार सेवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक असल्याचेही अधोरेखित करण्यात आले.

अन्न सुरक्षेबरोबरच पोषणालाही महत्त्व देण्यात आले. केंद्र सरकारच्या 'पीएम पोषण' योजनेद्वारे शालेय विद्यार्थ्यांना पौष्टिक शिजवलेले अन्न उपलब्ध करून दिले जाते. तसेच, भरडधान्यांच्या प्रचारातून पारंपरिक आणि पौष्टिक पिकांचे महत्त्व स्पष्ट होते. गरीब व दुर्बल घटकांना



परवडणाऱ्या दरात अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेत (WTO) सार्वजनिक अन्नधान्य साठवणुकीच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरजही भारताने मांडली.

### ■ महिलांच्या आर्थिक स्वावलंबनावर भर

महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हा सर्वसमावेशक विकासाचा महत्त्वाचा आधार असल्याचे भारताने नमूद केले. महिलांना बँकिंग सुविधा, आर्थिक सेवा आणि उद्योग-व्यवसायासाठी आवश्यक अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

बँक खाती, डिजिटल ओळख आणि मोबाईल कनेक्टिव्हिटी यांच्या एकत्रित वापरामुळे सरकारी कल्याणकारी योजनांचे लाभ थेट लाभार्थ्यांच्या खात्यांत जमा करणे शक्य झाले आहे. महिलांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना आणि महिला उद्योजकांना प्रोत्साहन दिल्यास रोजगाराच्या संधी वाढण्याबरोबरच त्यांची आर्थिक स्वायत्तता आणि निर्णयक्षमताही मजबूत होऊ शकते, अशी भूमिका भारताने मांडली.

### ■ डिजिटल सुविधांमुळे ग्रामीण विकासाला चालना

डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांकडे विकासाची क्षमता वाढविणारी महत्त्वपूर्ण गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे, असे भारताने स्पष्ट केले. परस्परांशी जोडलेल्या डिजिटल प्रणालींमुळे सरकारी सेवांचे वितरण अधिक प्रभावी होऊ




शकते आणि नागरिकांना विविध योजनांचा लाभ घेणे सुलभ होते.

विशेषतः महिला आणि ग्रामीण भागातील नागरिकांना परवडणारी इंटरनेट सुविधा, डिजिटल साक्षरता आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांची उपलब्धता सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला. डिजिटल तंत्रज्ञानाचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि आर्थिक गुंतवणूक वाढविण्याची गरजही अधोरेखित करण्यात आली.

### ■ आंतरराष्ट्रीय सहकार्याद्वारे शाश्वत विकासाचे उद्दिष्ट

विकसनशील देशांच्या प्रगतीसाठी आर्थिक मदत, आधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्यविकास यांची सांगड घालणे आवश्यक असल्याचे भारताने स्पष्ट केले. विविध देशांनी आपले विकासाचे अनुभव आणि यशस्वी उपक्रम एकमेकांशी सामायिक केल्यास जागतिक स्तरावर विकासाच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात.

दक्षिण-दक्षिण सहकार्याच्या माध्यमातून भारत आपले विकासाचे अनुभव इतर विकसनशील देशांसोबत सामायिक करत राहील, अशी भूमिकाही मांडण्यात आली.

अन्न सुरक्षा मजबूत करणे, महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे आणि डिजिटल सुविधांचा लाभ ग्रामीण भागासह समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, हा शाश्वत विकासाचा महत्त्वाचा मार्ग आहे.

# जव्हारमधील गगनगिरी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांचा भीषण दुचाकी अपघात !

## दोन विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू; तिघे गंभीर जखमी, नाशिक सिव्हिल रुग्णालयात उपचार सुरू

## आश्रमशाळेतील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह; विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**जव्हार (वा.)** | जव्हार : पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील गगनगिरी आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दुचाकीचा भीषण अपघात झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. रात्री साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या अपघातात दोन विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तीन विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. जखमी विद्यार्थ्यांवर नाशिक येथील सिव्हिल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे जव्हार परिसरात हळहळ व्यक्त होत असून, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

दोन विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू; तिघांची प्रकृती गंभीर

या भीषण अपघातात प्रीतम गणेश पोटिंदा (वय १५) आणि सुमित मोतीराम गिंभाल (वय १८) या दोन विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला. तर सुमित जितेश भोरे (वय १६), रुस्तम अजित पोटिंदा (वय १०) आणि सुजित सुनील पोटिंदा (वय १८) हे तिघे विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर नाशिक येथील सिव्हिल रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

कमी वयातील विद्यार्थ्यांवर ओढवलेल्या या दुर्दैवी प्रसंगामुळे परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे. दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### ■ आश्रमशाळेतील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

या घटनेनंतर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित




होत आहेत. निवासी आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाची, सुरक्षिततेची आणि दैनंदिन देखरेखीची जबाबदारी संबंधित प्रशासनाची असते. असे असताना रात्रीच्या सुमारास विद्यार्थी वसतिगृहाबाहेर कसे गेले, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

विद्यार्थ्यांकडे दुचाकी वाहन आले कुठून? रात्रीच्या वेळी विद्यार्थी बाहेर जात असताना वसतिगृहातील अधीक्षक उपस्थित होते का? विद्यार्थ्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक देखरेख व्यवस्था होती का? सुरक्षारक्षकांची नेमणूक होती का? असे अनेक प्रश्न या दुर्घटनेच्या निमित्ताने पुढे आले आहेत.या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी संबंधित प्रशासनाने घटनेची सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. मात्र, चौकशी पूर्ण होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरवणे योग्य ठरणार नाही.

### ■ पालकांमध्ये चिंता; चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची गरज

आश्रमशाळांमध्ये ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी निवासी स्वरूपात राहतात. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी अधिक महत्त्वाची ठरते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रशासनाने नियमित तपासणी आणि प्रभावी देखरेख व्यवस्था ठेवणे गरजेचे आहे.

या अपघाताची निष्पक्ष चौकशी करून दुर्घटनेचे नेमके कारण स्पष्ट करावे, आश्रमशाळेतील सुरक्षा व्यवस्थेची तपासणी करावी आणि चौकशीत निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### ■ विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना आवश्यक

दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू आणि तिघांची गंभीर प्रकृती ही घटना अत्यंत वेदनादायी आहे. या दुर्घटनेतून निवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आश्रमशाळांमधील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करणे, विद्यार्थ्यांच्या हालचालींवर योग्य देखरेख ठेवणे आणि नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांचे जीवन अनमोल आहे. या दुर्घटनेची सखोल चौकशी करून सत्य समोर आणण्याबरोबरच आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महायुतीचे सतीश चव्हाण हेच अभ्यासू आणि कार्यक्षम उमेदवार !

## आ. सुरेश धस यांचा विश्वास; पदवीधर मतदार संवाद मेळाव्यात विजयाचा निर्धार

**आष्टी | प्रतिनिधी**

मराठवाडा विभाग पदवीधर मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांनी विधान परिषदेत गेल्या तीन टर्ममध्ये अभ्यासपूर्ण आणि कार्यक्षम कामगिरी केली आहे. पदवीधर, सुशिक्षित बेरोजगार, शिक्षक, शिक्षण संस्था आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यामुळे पदवीधर मतदारांनी सतीश भानुदासराव चव्हाण यांना पहिल्या पसंतीचे मत देऊन मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.

आष्टी येथे आयोजित पदवीधर मतदार संवाद मेळाव्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी सभापती आदिनाथ सानप, आष्टी भाजपाध्यक्ष अनिल ढोबळे, रमेश गावडे, पाटोदा भाजपाध्यक्ष भागवत येवले, शिरूर कासार भाजपाध्यक्ष सुरेश उगलमुगले, अभियंता किशोर हंबर्डे, अतुल मेहेर, शिरूरचे नगराध्यक्ष गाडेकर आणि प्राचार्य विजय दानवे यांची उपस्थिती होती.

आमदार धस म्हणाले की, सतीश चव्हाण



यांची विधान परिषदेतील कामगिरी त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीतून दिसून येते. वैद्यकीय शिक्षणातील प्रवेशासंदर्भातील मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यातील ७०:३० टक्के आरक्षणाची अट रद्द करण्याच्या निर्णयाच्या प्रक्रियेत त्यांनी महत्त्वपूर्ण पाठपुरावा केला. पदवीधर मतदारसंघाचे कार्यक्षेत्र आठ जिल्हे आणि ७८ तालुक्यांमध्ये विस्तारलेले असल्याने प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणे आव्हानात्मक आहे. मात्र, सतीश चव्हाण यांनी उपलब्धतेनुसार मतदारांच्या सुख-दुःखात सहभागी होत जनसंपर्क कायम ठेवला आहे.

ते पुढे म्हणाले की, सतीश चव्हाण हे मराठवाडा शिक्षक प्रसारक मंडळाचे सचिव असून छत्रपती संभाजीनगर येथील त्यांचे कार्यालय सातत्याने कार्यरत असते. गेल्या काही वर्षांत त्यांनी पदवीधरांचे प्रश्न, सुशिक्षित बेरोजगारांच्या समस्या, शिक्षकांचे प्रश्न तसेच शैक्षणिक संस्था आणि त्यातील कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. निवडणुकीच्या काळात सोशल मीडियावर चुकीची माहिती आणि खोटे नॅरेटिव्ह पसरविण्याचे प्रकार होत असले, तरी मतदार सुज्ञ असून ते उमेदवाराचे काम आणि कार्यक्षमता पाहूनच निर्णय घेतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सतीश चव्हाण हे महायुतीचे अधिकृत उमेदवार असल्याचे स्पष्ट करून त्यांना विजयी करण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करून सतीश चव्हाण यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असेही आ. धस यांनी सांगितले.

यावेळी प्राचार्य विजय दानवे म्हणाले की, आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील पदवीधर मतदार आमदार सुरेश धस यांच्या भूमिकेला महत्त्व देतात. त्यामुळे त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सतीश चव्हाण यांना मोठ्या प्रमाणावर मतदान होईल आणि त्यांचा विजय निश्चित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

युवा कार्यकर्ते शेख समीर यांनी सुशिक्षित बेरोजगार पदवीधरांच्या अडचणी मांडल्या. लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर सुशिक्षित बेरोजगार पदवीधरांसाठीही आर्थिक अनुदानाची योजना सुरू करण्याची मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमाचे आभार सुरेश उगलमुगले यांनी मानले, तर सूत्रसंचालन ज्ञानेश्वर माऊली यांनी केले. यावेळी आष्टी तालुक्यातील विविध शिक्षण संस्थांचे शिक्षक, कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार आणि पदवीधर मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, गुरुवार, 22 ऑक्टोबर 2026

# ‘दुष्काळात चुकीचा निर्णय घेऊ नका; एक फोन सुरेश धसला करा!’

## शेतकरी, पशुधन आणि वन्यजीवांच्या मदतीसाठी २४ तास तत्पर; मच्छिंद्रनाथ गडाच्या १८ व्या दसरा मेळाव्यात आ. सुरेश धस यांची ग्वाही



## मायंबा हे श्रद्धा आणि स्फूर्तीचे स्थान; गडावर राजकीय भाष्य करणार नाही, पुढील वर्षापासून विजयादशमीच्या आदल्या दिवशी शस्त्रपूजनासह दसरा मेळावा

**आष्टी (प्रतिनिधी)**

“येणाऱ्या काळात दुष्काळाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे आतापासूनच आर्थिक नियोजन करा, अनावश्यक खर्च टाळा, पाण्याची बचत करा; मात्र संकटाच्या काळात हतबल होऊन कोणताही चुकीचा निर्णय घेऊ नका. अडचणीत असाल, तर एक फोन सुरेश धसला करा. तुमच्या मदतीसाठी मी २४ तास तत्पर आहे,” अशा आश्वासक शब्दांत आमदार सुरेश धस यांनी शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना धीर दिला. “यावेळी आपल्याला रडायचे नाही, तर लढायचे आहे,” असा निर्धार व्यक्त करत दुष्काळाच्या संकटाचा सामना एकजुटीने करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

आष्टी तालुक्यातील सावरगाव घाट येथील श्रीक्षेत्र मायंबा मच्छिंद्रनाथ गडावर विजयादशमी निमित्त मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी आयोजित १८ व्या दसरा मेळाव्यात आ. धस बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांच्यासह संत-महंत, नाथभक्त आणि भाविकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या मेळाव्यात दुष्काळाची संभाव्य तीव्रता, शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन, पशुधन व वन्यजीवांचे संरक्षण, आरोग्य सुविधांचा विस्तार, देवस्थानाचा विकास आणि दसरा मेळाव्याच्या परंपरेबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका मांडली.

■ **‘यावेळी रडायचे नाही, तर लढायचे!’**

आगामी काळातील दुष्काळी परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करताना आ. सुरेश धस म्हणाले की, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक कुटुंबातील कर्त्या व्यक्तीने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आर्थिक नियोजन करावे. अनावश्यक खर्चाला आळा घालावा आणि उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य विनियोग करावा. संकट येण्याची वाट न पाहता आतापासूनच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

दुष्काळाचा फटका केवळ शेतकऱ्यांनाच बसत नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सर्वसामान्य कुटुंबांवरही त्याचे गंभीर परिणाम होतात. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारीने वागणे गरजेचे आहे. संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहून सामूहिक प्रयत्नांतूनच या परिस्थितीवर मात करता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

■ **शेतकऱ्यांनी हतबल होऊ नये; शासनस्तरावर पाठपुरावा सुरू**

दुष्काळामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचा उल्लेख करताना आ. धस यांनी शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना खचून न जाण्याचे आवाहन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रयत्न केले जातील. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असून, मतदारसंघातील जनतेने संकटामुळे हतबल होण्याची गरज नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

“अडचण कोणतीही असो, मदतीसाठी संपर्क साधा. तुमची अडचण दूर करण्यासाठी निश्चित प्रयत्न करेन,” अशी ग्वाही देत त्यांनी शेतकरी आणि नागरिकांना धीर दिला. दुष्काळाच्या काळात केवळ माणसांचाच नव्हे, तर पशुधन आणि वन्यजीवांचाही विचार करणे गरजेचे आहे. या मुक्या जीवांचे संरक्षण करण्यासाठीही सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

■ **मायंबा हे श्रद्धेचेच नव्हे, तर स्फूर्तीचे स्थान!**

श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाशी असलेल्या आपल्या भावनिक नात्याविषयी बोलताना आ. धस म्हणाले की, “हा गड लोहचुंबकासारखा आहे. एकदा येथे आल्यानंतर पुन्हा पुन्हा यावेसे वाटते. हे माझ्यासाठी श्रद्धेचे आणि स्फूर्तीचे स्थान आहे.” सन १९९७ पासून आपण या गडावर येत असल्याचे सांगत त्यांनी या देवस्थानाच्या धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्वावर प्रकाश टाकला.

सन २००८ पासून दसरा मेळाव्याची परंपरा सुरू झाली असून, यंदा या मेळाव्याचे १८ वे वर्ष आहे. या पवित्र स्थळाचे महत्त्व केवळ दोन जिल्ह्यांपुरते मर्यादित न राहता संपूर्ण देशभर पोहोचले पाहिजे. नाथ संप्रदायाच्या या महत्त्वपूर्ण तीर्थक्षेत्राची महती देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे ते म्हणाले.

■ **‘या पवित्र व्यासपीठावर राजकीय भाष्य करणार नाही!’**

मच्छिंद्रनाथ गडाच्या व्यासपीठाची परंपरा आणि पावित्र्य जपण्याची भूमिका स्पष्ट करताना आ. धस यांनी सांगितले की, या ठिकाणी आल्यानंतर मनाला नवी ऊर्जा आणि स्फूर्ती मिळते. त्यामुळे या धार्मिक व्यासपीठावर राजकीय भाष्य केले नाही आणि यापुढेही करणार नाही. राजकीय विचार मांडण्यासाठी अन्य व्यासपीठे उपलब्ध आहेत. मात्र, मच्छिंद्रनाथ गडावर धार्मिक परंपरा, अध्यात्म आणि नाथ संप्रदायाच्या विचारांचा सन्मान कायम राखला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

■ **गडाच्या विकासासाठी ४५० कोटींचा आराखडा**

मच्छिंद्रनाथ देवस्थानाच्या विकासाबाबत माहिती देताना आ. धस म्हणाले की, देवस्थानचे ट्रस्ट २००७ मध्ये स्थापन झाले. मतदारसंघाचे दहा वर्षे आमदार नसताना या काळात गडासाठी निधी उपलब्ध झाला नाही. मात्र, पुन्हा आमदार झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सध्या मंदिराचा विकास आराखडा किमान ४५० कोटी रुपयांचा असल्याचे त्यांनी सांगितले.

गडाचा सर्वांगीण विकास करून या तीर्थक्षेत्राला देशपातळीवर महत्त्वाचे स्थान मिळवून देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

■ **चार रेडक्रॉस दवाखाने; प्रत्येक जिल्हा परिषद गटात ‘नमो दवाखाना’**

आरोग्य सुविधांबाबत बोलताना आ. धस यांनी दोन महिन्यांपूर्वी मतदारसंघात आयोजित महाआरोग्य शिबिराचा उल्लेख केला. या शिबिरानंतरही गरजू रुग्णांना मदत करण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्वसामान्य रुग्णांना परवडणाऱ्या दरात उपचार मिळावेत, यासाठी आष्टी, कडा, पाटोदा आणि शिरूर येथे चार रेडक्रॉस दवाखाने सुरू करण्यात येणार आहेत. या दवाखान्यांमध्ये उपचारासाठी होणाऱ्या एकूण खर्चापैकी रुग्णांना केवळ २५ टक्के खर्च करावा लागेल, अशी व्यवस्था करण्याचा प्रयत्न आहे. याशिवाय जिल्हा परिषदेच्या प्रत्येक गटात एक याप्रमाणे १३ नमो दवाखाने सुरू करण्याचे नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली.

या सुविधांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक पातळीवर उपचार उपलब्ध होण्यास मदत होईल आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

■ **पुढील वर्षापासून दसरा मेळावा आदल्या दिवशी; शस्त्रपूजनासह सायंकाळी आयोजन**

दसरा मेळाव्याच्या आयोजनाबाबत महत्त्वपूर्ण घोषणा करताना आ. सुरेश धस यांनी पुढील वर्षापासून विजयादशमीच्या आदल्या दिवशी शस्त्रपूजन करून दसरा मेळावा आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला. हा मेळावा सायंकाळी ६ ते ८ या वेळेत घेण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

विजयादशमीच्या दिवशी नागरिकांना सणासुदीची विविध कामे असतात. त्यामुळे भाविकांना धार्मिक कार्यक्रमात सहभागी होणे सोयीचे व्हावे, या उद्देशाने वेळ आणि दिवसात बदल करण्याचा विचार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. २००८ पासून सुरू असलेली दसरा मेळाव्याची परंपरा यापुढेही धार्मिक वातावरणात आणि नियोजनबद्ध पद्धतीने सुरू राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

■ **संत-महंत, नाथभक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती**

या १८ व्या दसरा मेळाव्यास श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह.भ.प. श्री विठ्ठल महाराज, ह.भ.प. बाळू महाराज गिरगावकर, भागवताचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जवळेकर, काशिनाथ महाराज (गणेशगड), माजी आमदार साहेबराव नाना दरेकर, ह.भ.प. रामाचार्य मंदार महाराज, ह.भ.प. रामकृष्ण महाराज, ह.भ.प. रोहिदास महाराज, ह.भ.प. गव्हाणे महाराज, केदार महाराज, ह.भ.प. कल्याण महाराज कोल्हे, ह.भ.प. मोहन महाराज शेलार, ह.भ.प. शिवाजी महाराज जगताप, ह.भ.प. अशोक महाराज भोसले, ह.भ.प. लक्ष्मण महाराज सस्ते, ह.भ.प. विनायक महाराज औटे-म्हस्के, ह.भ.प. कमण लक्ष्मण महाराज म्हस्के, ह.भ.प. भानुदास महाराज म्हस्के, ह.भ.प. दिनकर महाराज म्हस्के, ह.भ.प. मालुसरे महाराज, उंबरेकर महाराज, सुवर्णा गिरी, महाराष्ट्र सरपंच परिषद अध्यक्ष दत्ता काकडे, नाथगायक आकाश शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, नाथभक्त आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळाच्या संभाव्य संकटात शेतकऱ्यांना धीर देणारा संदेश, गरजू रुग्णांसाठी आरोग्य सुविधांचा विस्तार, मच्छिंद्रनाथ गडाच्या विकासाचा संकल्प आणि धार्मिक परंपरेचे जतन या विविध मुद्द्यांमुळे यंदाचा दसरा मेळावा विशेष महत्त्वाचा ठरला. श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संगम घडविणाऱ्या या मेळाव्यातून संकटाच्या काळात एकजुटीने उभे राहण्याचा संदेश देण्यात आला.

■ **"एकजुटीने दुष्काळावर मात करूयात, अडी-अडचणीत मला थेट फोन करा"**

ठिकाण व प्रसंग: बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील मायांबा येथील मच्छिंद्रनाथ गडावर विजयादशमी (दसरा) निमित्त दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार सुरेश धस यांचे आवाहन: पावसामुळे आलेल्या दुष्काळाच्या संकटाचा सर्वांनी मिळून सामना करावा, पाण्याचा बचत करावी आणि अनावश्यक खर्च टाळावा, असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी जनतेला केले. आष्टी मतदारसंघातील जनतेला कोणतीही अडचण आल्यास थेट फोन करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

आरोग्य सुविधा व विकास: आगामी काळात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना आणि आरोग्याच्या प्रश्नांना प्राधान्य दिले जाईल. मतदारसंघात ४ रेडक्रॉस आणि ९३ नमो दवाखाने सुरू करण्यात येणार असून, उपचारासाठी होणाऱ्या एकूण खर्चापैकी केवळ २५ टक्के खर्च रुग्णांना करावा लागेल, अशी व्यवस्था करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मच्छिंद्रनाथ गडाच्या विकासासाठी किमान ४५० कोटी रुपयांचा विकास आराखडा असल्याचे जाहीर केले.

पुढील वर्षापासून वेळेत बदल: दसरा मेळाव्याच्या वेळेबाबत बोलताना, पुढील वर्षापासून हा मेळावा संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत घेण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला, जेणेकरून नागरिकांना सणासुदीच्या दिवशी विविध कामांमुळे मेळाव्यात सहभागी होणे सोयीचे होईल.

### ‘आ. धस यांच्या प्रयत्नांमुळे गडाचा कायापालट’ — माजी आमदार दरेकर

यावेळी माजी आमदार साहेबराव नाना दरेकर यांनी मनोगत व्यक्त केले. आमदार सुरेश धस यांनी मच्छिंद्रनाथ गडाकडे विशेष लक्ष दिल्यापासून गडाचा कायापालट झाला असल्याचे त्यांनी नमूद केले. गडाच्या विकासासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे या धार्मिक स्थळाला नवी दिशा मिळत असल्याचे सांगत दरेकर यांनी त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. सध्या दुष्काळाचे सावट गंभीर होत चालले असून, अशा परिस्थितीत शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

---

# जिरेवाडी येथील वारकरी संप्रदायाचे ज्येष्ठ निस्सीम वारकरी संभूदेव मुंडे यांचे निधन

**परळी वैजनाथ (तालुका प्रतिनिधी):**

जिरेवाडी (प्रभू सोमेश्वरांच्या नगरीतील) वारकरी संप्रदायात निस्सीम भक्ती आणि अतुलनीय सेवा करणारे ज्येष्ठ वारकरी श्री. संभूदेव पाटलोबा मुंडे (अण्णा) यांचे विजयादशमीच्या (दसरा) पवित्र दिवशी निधन झाले. त्यांच्या निधनाने जिरेवाडीसह परिसरातील वारकरी संप्रदायात आणि भक्तिमार्गात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी आपले संपूर्ण जीवन संघर्षातून उभे केले होते. कीर्तनाची सुरुवात, वारकरी भजन, हरिपाठ असो किंवा काकडा आरती—प्रभूच्या प्रत्येक निरंतर सेवेमध्ये त्यांनी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले होते. गावातील प्रत्येक सप्ताहात त्यांची सक्रिय आणि प्रेरणादायी उपस्थिती असायची.

पालखी सोहळ्यासह अखेरचा श्वास:

दसरा व विजयादशमीच्या पर्वावर प्रतिवर्षाप्रमाणे जिरेवाडी येथे श्री सोमेश्वर महाराजांची पालखी निघाली होती. पालखी निघाल्यानंतर ग्रामस्थांनी त्यांच्या भेटी घेतल्या. याच दरम्यान प्रभू सोमेश्वरांची, संत ज्ञानेश्वरांची आणि संत तुकारामांची आरती त्यांच्या अखेरच्या क्षणी कानावर पडत असतानाच, हा संपूर्ण पालखी सोहळा पूर्ण झाल्यावर



त्यांनी आपले प्राण सोडले. हा भावुक प्रसंग उपस्थितांच्या मनाला चटका लावून जाणारा ठरला.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

राख सावडण्याचा विधी:

श्री. संभूदेव मुंडे (अण्णा) यांच्या मृत्यूनंतरचा राख सावडण्याचा विधी दिनांक २२ ऑक्टोबर २०२६, गुरुवार रोजी सकाळी ७:०० वाजता जिरेवाडी येथील स्मशानभूमीत संपन्न होणार आहे. त्यांच्या जाण्याने जिरेवाडी पंचक्रोशीत शोककळा पसरली आहे.

---

# धरण, नदी, नाले व तलाव यामधुन पाणी उपसा चा आदेश मागे घेऊन कॅनॉल मध्ये पाणी सोडा

## काँग्रेस कमिटीची तहसीलदाराला निवेदनातून मागणी

**महागाव प्रतिनिधी**

धरण, नदी, नाले व तलाव यामधुन पाणी उपसा चा आदेश स्थगित करावा कारण शेतामध्ये खरीब हंगाम चालु असंतांना हळद व उस या पिकाची वरील धरण, नदी, नाले व तलाव या पाण्यावर अवलंबुन लागवड केलेली आहे. सदरील पिकासाठी आज पर्यंत शेतक-यांनी एकरी साधारणपणे १,२०,०००/- पर्यंत खर्च केलेला असुन आज हळद या पिकाची परिस्थीती ही हळदीच्या कांड्या धरण्याच्या आवस्थेत आहे. आणि या ८ ते १५ दिवसामध्ये वरील दोन्ही पिकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

तर याला कडे लक्ष केंद्रित करून वेणी धरणाची



पाणीही नद्या कोरड्या झाल्यामुळे गुराढोरासहित शेतकऱ्यांचेंही हातचे पीक जाण्याच्या स्थितीत असल्यामुळे वेनी लोअर पूस प्रकल्पामधील पाणी कॅनॉल आणि नदीला पाणी सोडण्यात यावे जेणेकरून उद्भवलेली गंभीर परिस्थिती मार्गी लागेल.

आधिच खरीप हंगामातील सोयाबीन या पिकाच्या उत्पादनामुळे शेतक-यावर उपासमारीची तथा कर्ज बाजारीपणाची सदृश्य परिस्थिती उदभवलेली आहे. तरी आपण वरील प्रमाणे आपण दिनांक ४/१०/२०२६ रोजी धरण, नदी, नाले व तलाव यामधुन पाणी उपसा करण्यासाठी लावलेले मोटर पंप शेतकरी बांधवानी काढण्याबाबत जो आदेश दिला तो रद्द करून शेतक-यांना दिलासा दयावा व त्यांच्यावर उदभवणा-या संभाव्य परिस्थीसी पाहता आदेश मागे घेण्याची मागणी तहसीलदारांना कॉंग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली यावेळी शिवाजीराव देशमुख जि.उ.भा. रा.कॉ.यवतमाळ,सुनिल राठोड ता.अ.कॉ.क. महागांव,सौ. जयश्री संजय नरवाडे तालुकाध्यक्ष महिला कॉ. क. महागांव,शैलेश कोपरकर शहराध्यक्ष.कॉ.क. महागांव,भगवान पंडागळे,बंटी पठाण,वि.अ.यु. कॉ.क. यवतमाळ

---

# त्रिपुराचे मुख्यमंत्री डॉ. माणिक सहा यांच्या अगरतळा निवासस्थानी दुर्गोत्सव उत्साहात; मा .किरण गित्ते साहेब IAS यांनी घेतले माँ दुर्गेचे दर्शन

**परळी** | त्रिपुराचे माननीय मुख्यमंत्री डॉ. माणिक सहा यांच्या अगरतळा येथील निवासस्थानी आयोजित पारंपरिक दुर्गोत्सवाला नवमीच्या शुभमुहूर्तावर विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी भेट दिली. मुख्यमंत्री डॉ. माणिक सहा आणि त्यांच्या परिवाराद्वारे आयोजित या पारंपरिक दुर्गोत्सवाचे यंदा १०९ वे वर्ष आहे.

या प्रसंगी मुख्यमंत्र्यांचे सचिव श्री. किरण गित्ते साहेब (IAS) यांनी आपल्या सुविद्य पत्नी विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा:सौ. उषाताई किरण गित्ते यांच्यासह उपस्थित राहून माँ दुर्गेचे मनोभावे दर्शन घेतले आणि आशीर्वाद प्राप्त केले.

"**सर्वस्वरूपे सर्वेशे सर्वशक्तिसमन्विते।**
**भयेभ्यस्त्राहि नो देवी दुर्गे देवी नमोऽस्तुते॥**"

या मंत्रोच्चाराने दुर्गोत्सवाचा मंडप भक्तिमय वातावरणाने उजळून निघाला होता. दर्शन प्रसंगी श्री. किरण गित्ते आणि त्यांच्या सुविद्य पत्नी यांनी माननीय मुख्यमंत्री डॉ. माणिक सहा आणि त्यांच्या धर्मपत्नी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व त्यांना दुर्गोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

